# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक विचार व कार्य

**अमोल विश्वनाथ ऐवळे,** संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.
aiwaleamol91@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

आधुनिक महाराष्ट्राची आणि भारताची सामाजिक पूनर्घटना विवेकाच्या आणि न्यायाच्या आधारे वाटचाल करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोजक्या विभुती पैकी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे होते.ते मुळात धर्मनिष्ठ पुरुष होते. मात्र उन्नत भूमिकेवरील धर्मकार्य आणि सामाजिक,राजकीय कार्य एकरूपच आहेत.अशीत्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांच्या जीवनात अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला मध्यवर्ती स्थान होते. हे कार्य त्यांनी धर्मकार्य म्हणूनच केले. अस्पृश्यता निवारण्याचे कार्यहा त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता.

ज्या काळात समाजसुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य यांच्यामध्ये द्वैत उभे राहिले होते त्या काळात त्यांनी दोन्ही प्रवाहांचा संगम घडवून आणला आणि त्या पायी स्वतःची बरीच होरपळ ही करून घेतली. अस्पृश्य आणि ब्राम्होत्तर वर्गाचे हित काँग्रेस प्रणित राजकीय स्वातंत्र्यामध्ये आहे ही बाब त्यांनी अग्रपूर्वक आयुष्यभर मांडली. सार्वजनिक जीवनात अशी भूमिका घेणार आहेत जे तुरळक लोक होते त्यात शिंदे अग्रभागी होते. काँग्रेसला अस्पृश्ता निर्माणचा ठराव एकमताने पास करायला लावण्यासाठी शिंदेच कारभूत होते. बहुजन या संकल्पनेला जसा जाती विशिष्ट अर्थनंतर प्राप्त झाला तसा त्यांनी कधीच अभिप्रेत नव्हता.

**उद्दिष्टे :-**

1. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक विचारांची माहिती घेणे.
2. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक कार्याची माहिती घेणे.

**संशोधन पध्दती :-**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी मी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर केलेला असूनयामध्ये मी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

**सामाजिक विचार :-**

आपली भावी सामाजिक सुधारणा बाबांच्या भागवत धर्मातून उदय पावली असे विठ्ठल रामजी शिंदे यांना वाटे. प्रार्थना अथवा ब्रह्म समाजाचा मराठा वरच नव्हे तर इत्तरी महाराष्ट्रावर फारसा परिणाम झालेला नसताना महर्ष शिंदे मात्र त्यांचे अजूक प्रचारक बनले यांचे श्रेय समाजापेक्षाही त्यांच्या वडिलांनी घालून दिलेल्या आचरणाच्या धड्याकडेच जास्त जाते.

**भारतीय निराश्रित सहाय्यकारी मंडळी :-**

भारतीय अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी ध्येयाने,त्यागाने झपाटलेल्या महर्षी शिंदेंनी १८ ऑक्टोंबर १९०६ रोजी भारतीय निरक्षित सहाय्यकारी मंडळी (डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया) ची स्थापना केली. मानवतेला लागलेला अस्पृश्यता हा भयंकर कलंक धुऊन टाकण्यासाठी सर्व बाजूने प्रयत्न झाला पाहिजे; त्यासाठी समाजाचा रोष पत्करावा लागला तरी चालेल, वेळप्रसंगी समाजाचे दोन हात करण्याची पाळी आली तरी बेहत्तर असा निश्चय करून ते अस्पृश्योद्धराच्या कार्याला लागले.

अस्पृश्याउद्धराचे कार्य करण्यासाठी म्हणून ते म्हणतात “हिंदुस्थानातील बहिष्कृत वर्गाच्या अडचणी त्यांची प्रांतवर संख्या त्यांची निवारणार्थ वरिष्ठ वर्गाकडून होणारे निरनिराळे प्रयत्न आणि स्वतः त्या लोकांकडून स्वोद्धारार्थ होणारे प्रयत्न ह्यांची मी प्रथमच व्यवस्थशिर मांडणी केली.या लोकांच्या उद्धारासाठी नुसती शिक्षण संस्था मग ती कितीही मोठ्या प्रमाणावर असो स्थापून चालवायचे नाही तर त्यामध्ये जिवंत व्यक्तिगत पुढाकार आहे असे एक मिशन तयार झाले पाहिजे.” अशा मिशनच्या स्थापनेची भूमिका स्पष्ट होते. या मिशनचा हेतू आणि कार्य याविषयी सांगताना महर्षी शिंदे लिहितात, अस्पृश्यामध्ये शिक्षण प्रसार, त्यांना नोकरी मिळवून देणे, त्यांच्या सामाजिक अडचणीचे निवारण करणे आणि

त्यांच्याच सार्वत्रिक धर्म व्यक्तिगतशील आणि नागरिकता वगैरे गुणांचा प्रसार करणे. या संस्थेच्या माध्यमातून महर्षी शिंदे यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. त्यांमध्ये अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करणे, त्यांच्यासाठी वसतिगृहे उघडणे, शिवणकामाचे वर्ग चालवणे, प्रबोधनपर व्याख्याने कीर्तने आयोजित करणे, आजारी असणाऱ्या लोकांची सेवा करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश या संस्थेच्या कार्यामध्ये होता.

राष्ट्रीय सभेने अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला महत्त्व द्यावे म्हणून कर्मवीर शिंदे यांनी फार प्रयत्न केले. त्यांनी ठीकठिकाणी अस्पृश्यतांच्या परिषदा भरविला इ.स.१९१७ मध्ये ऑनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन कोलकत्यात भरले, या अधिवेशनात शिंदे यांच्या प्रयत्नामुळेच एक मुखाने अस्पृश्यता निवडण्याचा ठराव मंजूर केला.

**महर्षी शिंदे यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन :-**

महर्षी शिंदे यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेतून आणि मांडलेल्या विचारातून हेच सिद्ध होते की त्यांचा स्त्रियांच्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन समतावादी होता. त्यामुळेच स्त्रियांचे शिक्षण, विवाह आणि त्यांना द्यायचे स्वातंत्र्य याविषयी ते सदैव आग्रही होते. प्रार्थना समाजाच्या मुंबई शाखेतील विविध उपक्रमाच्या जोडीने इ.स.१९०७ साली निराश्रित सेवासदनची स्थापना करून त्यात दलित स्त्रिया,विधवा स्त्रियांच्या उद्धार हा प्रमुख विचार त्यांनी कार्यवाहीत करण्यात सुरुवात केली.

**मुरळी सोडण्याच्या प्रथेवर हल्ला :-**

अस्पृश्य वर्गात मुरळी वाहण्याची चाल होती. मुरळी वाहिलेल्या मुलीला पुढे आपले सारे जीवनच अनितीने हालअपेष्टाने काढावे लागे.त्यांनी या भयानक प्रकाराचा शोध- बोध घेऊनखितपत पडलेल्या मुलींचा शोध घेऊन त्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था केली. समाजकंटकांचा व प्रतिगाम्यांचा त्यास विरोध झाला. देवाला वाहिलेल्या मुलीप्रमाणेच वाघ्या,आराध्य, पोतराज,जोग्या अशी नावे धारण करून वाममार्गाने बीभत्स जीवन जगणाऱ्या आणि देवाला वाहिलेल्या मुलांनाही पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्थेत आश्रय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. इ.स.१९११ मध्ये मुरळी प्रतिबंधक परिषद त्यांनी भरविली वही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**मुलींच्या सक्तीच्या शिक्षणासाठी चळवळ :-**

मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाबाबत टिळक पक्ष्यांच्या भूमिकेला जोरदार विरोध करताना अण्णासाहेबांनी 'ज्ञानप्रकाश'मध्ये एक लेखमाला लिहिली. इ.स.१९१९ मध्ये पुणे पालिकेने मुलांना सक्ती शिक्षण देण्याचा ठराव पास केला होता; पण त्या ठरावातून मुलींना वगळणे हे त्यांना आवडले नाही म्हणून त्यांनी पुणे पालिकेवर मोर्चा नेला.रमाबाई रानडे,भगिनी जनाबाई यात त्यात सामील झाल्या होत्या. रँग्लर परांजपे शिक्षण मंत्री होताच त्यांनी मुलाप्रमाणे मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे देण्याचे ठरविले.

**शिमग्याची अनिष्ट चाल:-**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सामाजिक जीवनात चालत आलेल्या शिमग्याच्या सणाचे एक स्वरूप अत्यंत गलिच्छ व हिडीस असेच होते. शिव्या देणे,दारू पिणे,अंगाला शेण- राख लावणे यावर त्यांनी टीका केली. होळीच्या सणाविरुद्ध मोहीम काढणारा प्रचारक म्हणून ते प्रसिद्ध पावले. यासंदर्भात त्यांनी पुण्यात किर्लोस्कर थिएटरात एक सभा भरवली.हिंदू माणसांची व्यक्तिगत नीती बिघडणारी व सार्वजनिक वर्तनात असभ्यपणा आणणारी चाल ही बंद करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. होळीचा सण परंपरेप्रमाणे साजरा न करता त्या दिवसात शाळांच्या स्नेहसंमेलनाप्रमाणे खेळांच्या स्पर्धा गावोगावी घ्याव्यात, सभा भरवाव्यात,संवाद भाषण आयोजित करावीत. अभद्र प्रकार जेणेकरून थांबेल आणि सार्वजनिक संघटित क्रीडा महोत्सव होईल असे होळीच्या सणाला नवीन रूप देण्याचा अण्णासाहेबांनी स्तुत्य उपक्रम सुचविला.

**मद्यपान बंदी चळवळ:-**

महर्षी शिंदे म्हणतात"दारूच्या व्यापाराचा प्रश्न हा स्वराज्याचा किंवा परराज्याचा नसून व्याभिचाराचा सावळा गोंधळ आहे. दारू पिणारा एक, दुकान चालवणारा दुसरा, फायदा सरकारला आणि तोटा बहुजन समाजास असा हा सावळा गोंधळ आज शंभर वर्षे गाजत आहे तो कधी बंद होईल ?"सामाजिक जीवन निकोप बनावे.बहुजन समाज सुधारावा हा त्यांचा विचार या चळवळी मागेही दिसून आल्याशिवाय राहत नाही.

**दुष्काळ आपत्ती निवारक समिती :-**

इ.स.१९२० साली नगर व पुणे जिल्ह्यातील काही भागात भयंकर दुष्काळ पडला. दुष्काळाने हैराण झालेली अस्पृश्यांची सुमारे हजार कुटुंबे मिशनच्या मैदानात येऊन दाखल झाली. अण्णासाहेबांनी दुष्काळ आपत्ती निवारक समिती स्थापन करून शहरात धान्य,कपडे, पैसे इत्यादी जमविण्याचे काम धुमधडक्याने सुरू केले. दुष्काळग्रस्तांसाठीटेम्परारी चाळ व विस्तीर्ण मांडव उभारण्यात आला. लहान मुले वृद्ध माणसे यांना फुकट रेशन देण्यात येऊ लागले. अपंगांना फुकट जेवण मिळू लागले. हजारो जीवांचे प्राण वाचले. त्यानंतर कितीतरी दिवस या गोष्टीची आठवण काढून लोक डोळ्यात अश्रू आणून महर्षींना दुवा देत होते.

**निष्कर्ष:-**

दिन दुबळे आणि दलित यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी पद पैसा प्रतिष्ठा यांचा यत्किंचितहीमोहन ठेवता आयुष्यभर फकिरी पत्करून सेवावृत्तीने कार्य करीत राहणारे महर्षी विठ्ठलराव शिंदे यांच्या सारखी अपवादात्मकच म्हणावी लागेल. महर्षी शिंदे हे संपन्न समतोल व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे ऋषीतुल्य पुरुष होते. एखाद्या यज्ञात समिधा टाकावी त्याप्रमाणे सामाजिक आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या जीवनाची समिधाटाकली. हा त्यांचा महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक इतिहासाला मिळालेला अमोल ठेवाच आहे. त्यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात बहुजन समाजाच्या उद्धारासाठी ज्या मूलभूत आणि कळीच्या प्रश्नांना हात घातला त्या प्रश्नाचे स्वरूप आता कोठे समाजापुढे येऊ लागली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. पवार गो.मा, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे,लोकवाड्: मय,गृह प्रकाशन,मुंबई,२००४
2. प्रा.डॉ.दहातोंडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (व्यक्ति आणि विचार), प्रतिभा प्रकाशन,पुणे,१९९५
3. डॉ.पाटील लीला, जठार नाईक बाजीराव, यांनी घडविला महाराष्ट्र, परिप्रकाशन,कोल्हापूर, २०१३
4. डॉ. कदम शंकरराव,महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : साहित्य व कार्य, स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद.२०००
5. डॉ.एस.एस.गाठाळ, आंबेडकरी चळवळीचा इतिहास,कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद, २०१०
6. मोरे सदानंद, लोकसत्ता संपादकीय, पुणे, ११ एप्रिल २०१४